Pune Police

# पुणे शहर परिसरात सोनसाखळी चोरी करणाऱ्या इसमांना अटक, ५ गुन्हे उघडकीस

पुणे शहर परिसरात घडत असलेल्या चैन चोरीच्या गुन्हयास प्रतिबंध करण्याचे दृष्टीने श्री. सिताराम मोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा, युनिट ३, पुणे शहर यांनी हाताखालील कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करून गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सांगीतले होते.

पोलीस नाईक ८५८ जावेद पठाण यांना आरोपीत नामे १) मुजाहीद्दीनअली मिस्कीनअली इराणी वय २८ वर्ष रा. हुसेनी कॉलनी, बिदर राज्य कर्नाटक २) समीरअली दिलावरअली पंजाबी वय २३ वर्ष रा. परळी वैजनाथ जिल्हा बिड हे भुसवाळ येथे अटक असून त्यांनी पुणे शहरात गुन्हे केले असल्याची बातमी मिळाली होती. या आरोपीतांना दिनांक ०९/११/२०१६ रोजी स्वारगेट पोलीस ठाणे गु.र.नं ३१७/१६ भादंविक ३९२,३४ या गुन्ह्यात अटक करून मा.न्यायालयात हजर करून त्याची दि.१६/११/२०१६ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली होती.

आरोपींकडे रिमांड मुदतीत केले तपासात त्यांनी पुणे शहरात

१) स्वारगेट पोलीस ठाणे, गु.र.नं ३१७/१६ भादंविक ३९२,३४

२) हडपसर पोलीस ठाणे, गु.र.नं ५९८/१६ भादंविक ३९२,३४

३) हडपसर पोलीस ठाणे, गु.र.नं ६११/१६ भादंविक ३९२,३४

४) मुंढवा पोलीस ठाणे, गु.र.नं ११९/१६ भादंविक ३९२,३४

५) चतुःश्रृंगी पोलीस ठाणे, गु.र.नं ३९२/१६ भादंविक ३९२

असे एकुण ५ चैनचोरीचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले असून, नमुद आरोपींकडुन आज रोजी पर्यंत ११३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, किं.रू ३,५०,३००/- चे हस्तगत करण्यात आले आहेत.

वरील कामगिरी गुन्हे शाखेचे श्री.दिपक साकोरे, अतिरिक्त कार्यभार अपर पोलीस आयुक्त, श्री.पी.आर.पाटील, पोलीस उप-आयुक्त, श्री.सुरेश भोसले, सहाय्यक पोलीस आयुक्त, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सिताराम मोरे, सहा.पो.निरीक्षक, श्री रविंद्र बाबर, सहा.पो.फौजदार अशोक भोसले, स्टिवन सुंदरम, पो.हवा. शिवानंदन स्वामी, शिवाजी राहीगुडे, गजानन गाणबोटे, सुजित पवार, प्रविण भालचीम यांनी केली आहे.

गुन्हयाचा पुढिल तपास गुन्हेशाखा, युनीट-३ पुणे शहर कडील सहा. पोलीस निरीक्षक श्री रविंद्र बाबर, सहाय्यक पोलीस निरीक्षक हे करीत आहेत.

Pune Police




